**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २० मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च नागरी पुरस्कार, 'महाराष्ट्र भूषण 2024' साठी ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या नावाची विधानसभेत घोषणा.**
2. **नागपूरच्या अनेक भागात संचार बंदीमध्ये शिथिलता, तर हिंसाचाराचे आपत्तीजनक व्हिडीओ सोशलमीडियावर पोस्ट करणाऱ्या ५० लोकांविरोधात नागपुर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल.**
3. **नागपूर हिंसाचारामध्ये लोकांच्या नुकसान भरपाईसाठी पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश - महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांची माहिती.**
4. **विदर्भाच्या अनेक जिल्हयांमध्ये उद्या वादळी पर्जन्यमानाचा ऑरेंज अलर्ट, काही ठिकाणी गारपीट होण्याचा हवामान विभागाचा अंदाज.**

---------------------------------------

**'महाराष्ट्र भूषण'**

**महाराष्ट्र राज्याचा, सर्वोच्च नागरी पुरस्कार, 'महाराष्ट्र भूषण** 2024**' साठी, ज्येष्ठ शिल्पकार, राम सुतार यांच्या नावास, सर्वानुमते मान्यता मिळायची घोषणा, आज, विधानसभेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

*महाराष्ट्र भूषण 2024 पुरस्कार करता आणि राम सुतार ज्येष्ठ शिल्पकार यांच्या नावा सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे. त्याठिकाणी सांगितलं पाहिजे की श्रीराम सुतारसाहेब यांचे वय 100 वर्षे आहे आणि अजूनही त्या ठिकाणी ते शिल्प तयार करत आहेत आणि विशेषता आपलं जे चैत्यभूमीचं जे आपलं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होत आहे. त्याच्यामध्ये भारतरत्न, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्तीदेखील तेच तयार करतात.*

**दरम्यान, राम सुतार यांनी, शिल्पकलेत महाराष्ट्राचं नाव, जगात मोठे केलं. भारतातील सर्वात वयोवृद्ध, तपोवृद्ध आणि कला तपस्वी शिल्पकार, पद्मभूषण**

राम सुतार यांना, २०२४ चा, 'महाराष्ट्र भूषण' हा, सन्मान्य पुरस्कार आम्ही जाहीर केल्यानं, या पुरस्काराची प्रतिष्ठा उंचावली आहे अशा शब्दात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, राम सुतार यांचं अभिनंदन केलं.

---------------------------------------

भडकाऊ व्हीडिओ

सोमवारी ज्या भागात, नागपुरात हिंसा झाली त्यापैकी, काही भागांमध्ये आता शिथिलता देण्यात येत असून, पोलीस प्रशासन परिस्थीतीवर बारीक लक्ष ठेऊन आहे अशी माहिती, नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी दिली.

*कपिल नगर या पोलीस स्टेशनमधून संचारबंदी आज उठवण्यात आलेली आहे. तसेच परिमंडल तीन जे आहे. त्याच्यात लकडगंज पाचपावली, शांती नगर, परिमंडळ चारमध्ये सक्करदरा आणि इमामवाडा आणि परिमंडळ पाच मध्ये यशोधरानगर याच्या संचारबंदीमध्ये दोन तासाची सूट देण्यात आलेली आहे आणि तीन जे पोलीस स्टेशन आहे. झोन थ्री मध्ये त्याच्यात कोतवाली, तहसील आणि गणेशपेठ ते तीन पोलीस स्टेशन मध्ये जशी होती संचारबंदी चालू राहील.*

दरम्यान, नागपूरात औरंगजेबची कबर हटवण्यासाठी जे आंदोलन झालं त्या अनुषंगानं, सोशल मीडिया हॅण्डल वरून, काही भडकाऊ व्हीडिओ व्हायरल करण्यात आले होते. त्यात पोलिसां विरोधात हल्ल्याचा कट रचणे आणि भडकावू वक्तव्य, सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले होते. आपत्तीजनक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्या ५० लोकां विरोधात नागपुर, सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अशी माहिती सायबर सेलचे पोलीस उपायुक्त, लोहित मतानी यांनी आज नागपुरात आयोजीत पत्रकार परिषदेत दिली. याशिवाय संबंधित सोशल मीडिया कंपन्यांना अधिक तपशीलासाठी माहितीची विचारणा करण्यात आल्याचं ते म्हणाले

*आणि ह्या सगळ्याची माहितीसाठी आम्ही फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर आणि यूट्यूब त्याने सगळ्यांना पत्रलेला आहे. आज ते माहिती येऊ शकता कारण त्याच्यामध्ये 72 तासाचा ते टाइम लागतो. हे सगळे जे पोस्ट आहे. यामध्ये ते अराउंड 50-60 पर्सेंट पोस्ट डिलीट झालेले आहे आणि ते जे रिमेनिंग आहे त्यांच्या डिलिटिंग च्या प्रोसिजर चालू आहे.*

दंगल घडवण्यास प्रवृत्त करणारे १७२ व्हिडीओ सायबर पोलीसांच्या हाती लागलेले आहेत. त्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे. नागपुरात उसळलेल्या दंगलीमागे, बांगलादेशचे कनेक्शन संदर्भात विचारले असता,

सध्यातरी याची माहिती पोलिसांकडे नसून, काही सोशल मीडिया हॅण्डलच्या IP ऍड्रेसची तपासणी केली जात आहे असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, दंगलीच्या पार्श्वभूमीवर, नागपुरातील भानखेडा मोमीनपुरा इथल्या सेंट बी.टी. कॉन्व्हेंट शाळेतील, निष्पाप मुलांनी शहरात शांततेसाठी प्रार्थना केली.

----------------------------------------

**चिमणी दिवस**

आज जागतिक चिमणी दिवस. बुलढाण्यातील सुंदरखेड परिसरात राहणारे, राहुल चव्हाण यांच्या घरी, चिमण्यांचा मुक्त संचार असतो. त्यांनी त्यांच्या घरातील व्हरांड्यात, सज्जावर, चिमण्यांना घरटे करण्याची व्यवस्था करून दिली आहे. ते रोज चिमण्यांना दाणा-पाणी देतात. दरम्यान, आकाशवाणीच्या नागपूर केंद्रारून येत्या 22 मार्च रोजी सकाळी 10.35 वाजता दृष्टीक्षेप या कार्यक्रमात, जागतिक चिमणी दिवसानिमित्त खामगावचे पक्षीमित्र संजय गुरुव यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

----------------------------------------

**प्यारे जिया खान**

राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष, प्यारे जिया खान यांनी, नागपूर इथं प्रसार माध्यमांशी संवाद साधताना, सांगितलं की, नागपूरमध्ये सोमवारच्या रात्री झालेल्या हिंसाचारामध्ये, ज्या लोकांचं नुकसान झालं आहे, त्या लोकांच्या नुकसान भरपाईसाठी आपण, जिल्हाधिकारी महोदयांना पंचनामे करून, 48 तासात नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत. आज नागपूर पोलीस आयुक्तालयात त्यांनी, पोलिस आयुक्तांची भेट घेतली त्यावेळी ते बोलत होते.
*इसमें सीपी साहब से मेरा बात हुआ है। ये जो इसमें इनोसेंट लोग है उनको छोड़ा जाए। जो दंगाई है उनके साथ सरकार सख्त से सख्त कदम उठाये। जो लोग इनोसेंट है, उनका मुआवजा कैसा देना कलेक्टर साहब भी थे, उनसे मेरी बातचीत हुई है। सीपी साहब से बातचीत हुई है। डेफिनेटली करेंगे ।*

नागपूर हे शहर, हिंदू-मुस्लिम ऐक्याचं प्रतीक असून, कुठल्याही दंग्यामुळ त्याला, गालबोट लागता कामा नये. या हिंसाचारात जे दोषी आहे त्यांच्यावर तर कडक कारवाई होईलच, परंतु जे निर्दोष आहे त्यांना, सोडण्याची विनंती आपण, पोलीस आयुक्तांना केली असल्याचं, प्यारे जिया खान यांनी सांगितलं.

----------------------------------------

**महावितरण**

**वाढत्या उकाड्यापासून बचाव करण्यासाठी कुलरचा वापर वाढला असून, कुलर वापरताना काही महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास ते जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे, कुलर वापरताना योग्य ती खबरदारी घेण्याचं आवाहन, महावितरणनं केलं आहे. अर्थिंगची तपासणी करणे, आय.एस.आय. मार्क असलेले कुलर वापरणे, ई.एल.सी.बी. उपकरण बसविणे, कुलरची नियमित तपासणी आणि कुलरमध्ये पाणी भरताना काळजी घेणे अश्या सूचना, महावितरण कडून देण्यात आल्या आहेत.**

---------------------------------------

**हवामान**

**विदर्भातील वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये, उद्या काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान आणि गारपिटीचा, ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूर, गडचिरोली, अमरावती, वाशीम या जिल्ह्यांमध्ये, वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा, गोंदिया या दोन जिल्ह्यांमध्ये, ऑरेंज अलर्ट दोन दिवसांसाठी असून, या दरम्यान, नागरिकांनी सतर्क राहण्याचं आवाहन, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे करण्यात आलं आहे. आज सकाळपासून नागपुरात कमी अधिक प्रमाणात ढगाळ वातावरण होतं. दरम्यान, विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 41.1 अंश सेल्सिअस तर नागपुरात 39.2 अंश सेल्सिअस, इतक्या कमाल तापमानाची, नोंद करण्यात आली.**

---------------------------------------

**अंध बेरोजगार कल्याणकारी संस्था**

**महाराष्ट्र अंध, बेरोजगार कल्याणकारी संस्था, नागपूर तर्फे, येत्या 22 मार्च रोजी, श्रीगुरुदेव सेवाश्रम, गणेश पेठ इथं सकाळी अकरा वाजता, दृष्टी बाधित महिलांसाठी, महिला दिवसा निमित्त, कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येत असून, यासाठी मोठ्या संख्येनं दृष्टि बाधित महिलांनी उपस्थित राहण्याचं आवाहन संस्थेतर्फे करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाला, ज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी ठोंबरे यांची उपस्थिती राहणार आहे.**

---------------------------------------

**नवतेजस्विनी प्रदर्शन**

**महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त अकोला महिला आणि बाल विकास विभागाच्या सहकार्यानं, 'नवतेजस्विनी' प्रदर्शन, उद्यापासून नव्या बसस्थानका समोरील, स्वराज भवन परिसरात सुरू होईल. ग्रामीण महिला भगिनींनी निर्माण केलेली, अनेक उत्तमोत्तम उत्पादनं या प्रदर्शनाद्वारे अकोलेकरांना उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यातील सुमारे १०० बचत गटांचा प्रदर्शनात सहभाग असून, एकूण ५० दालनांद्वारे, रसायन, भेसळ विरहित खाद्यपदार्थ, शोभिवंत वस्तू, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त वस्तू अशा अनेक बाबी उपलब्ध होणार आहे. हे प्रदर्शन २३ मार्चपर्यंत रोज सकाळी** 10 **ते रात्री** 10 **दरम्यान सर्वांसाठी खुले आहे.**

**---------------------------------------**